# अमृतमय गुरुगाथा : खंड ४

# प.पू. रामानंद महाराजांच्या सान्निध्यातील अनुभव आणि त्यांच्याविषयीच्या अनुभूती

## विषयसूची


卐 सद्‌गुरु प.पू. भक्तराज महाराज यांचा संक्षिप्त परिचय ६

卐 प.पू. रामानंद महाराज यांचा संक्षिप्त परिचय ७

卐 लेखिकेचा परिचय ८

卐 मनोगत १०


---

## अनुक्रमणिका


१. डॉ. (सौ.) कुंदा आठवले ‘भक्तवात्सल्य आश्रम’, इंदूर (मध्यप्रदेश) येथे रहाण्यास जाणे १२

२. प.पू. रामानंद महाराज विद्यमान असतांना डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांनी ‘भक्तवात्सल्य आश्रम’, इंदूर येथे अनुभवलेले आश्रमजीवन १८

३. प.पू. रामानंद महाराज यांची काही गुणवैशिष्ट्ये २३

४. कुंदा आठवले यांनी प.पू. रामानंद महाराज यांच्या उपस्थितीत अनुभवलेल्या गुरुपौर्णिमा आणि प.पू. भक्तराज महाराज यांच्या गुरुभेटीचा सुवर्ण महोत्सव ! २९

५. डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांनी प.पू. रामानंद महाराज यांच्यासह केलेले प्रवास आणि त्या वेळी आलेले अनुभव ३७

६. प.पू. रामानंद महाराज यांची २ आजारपणे ५१

७. प.पू. रामानंद महाराज यांचा देहत्याग आणि घडलेल्या काही घटना ! ५३

८. प.पू. रामानंद महाराज यांच्या देहत्यागानंतर डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे ‘भक्तवात्सल्य आश्रम’, इंदूर येथे रहाणे न्यून करणे; तथापि आश्रमातील उपक्रमांत सहभागी होणे ६१

९. प.पू. रामानंद महाराज यांच्या देहत्यागानंतरही विविध प्रसंगांत डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांनी त्यांची अनुभवलेली अपार प्रीती ! ६३

१०. प.पू. भक्तराज महाराज आणि प.पू. रामानंद महाराज यांच्याकडून शिकायला मिळालेली सूत्रे ६९

११. डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांना प.पू. रामानंद महाराज यांच्या संदर्भात आलेल्या अनुभूती ७०

१२. डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांनी त्यांचे पती डॉ. जयंत आठवले यांच्या काही आजारपणांविषयी सांगितलेली सूत्रे ७८

१३. डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांनी भागवत सप्ताहाविषयी सांगितलेले दोन किस्से आणि अनुभवलेला आगळा-वेगळा नर्मदामातेला चुनरी अर्पण करण्याचा सोहळा ! १००

१४. प.पू. भक्तराज महाराज आणि प.पू. रामानंद महाराज यांच्या इच्छेने त्यांच्याविषयीचा ग्रंथ अन् आध्यात्मिक वाटचाल यांविषयी लिखाण पूर्ण करणे १०२

१५. प.पू. रामानंद महाराज यांची माया आणि कृपाशीर्वाद यांमुळे जीवनाची वाटचाल सोपी होणे १०३

# मनोगत

**१. प.पू. भक्तराज महाराज यांच्याविषयी भक्तांशी बोलतांना त्यांनी 'कुंदाताईंची 'गुरुगीता' चालली आहे', असे म्हणणे :** 'एकदा इंदूर आश्रमातल्या गणेश सभागृहाच्या बाहेरच्या चौकात आम्ही बायका बोलत बसलो होतो. तेव्हा प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) कुणाचा तरी हात धरून बाहेर चालले होते. आमच्या समोरून जाता जाता माझ्याकडे बघून ते म्हणाले, ''कुंदाताईंची 'गुरुगीता' चालली आहे.'' खरोखरच त्या वेळी मी त्या सगळ्यांशी प.पू. बाबांबद्दलच बोलत होते. तेव्हा 'पुढे भविष्यात खरोखरच 'गुरुगीता' (अमृतमय गुरुगाथा) लिहायची वेळ येईल', असे मला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते.

**२. मुंबईच्या भक्तांशी बोलतांना प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्याविषयी आठवणी निघणे, भक्तांनी 'हे सर्व लिहून काढा', असे सांगणे अन् त्या वेळी ते फारसे मनावर न घेणे :** आमचा मुंबईचा जो गट आहे, तो कुठल्याही निमित्ताने एकत्र आला की, हमखास प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या आठवणी निघायच्या. मी प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्याविषयी जे अनुभवले, त्याविषयी मी त्यांना बरेच काही सांगायचे. तेव्हा त्यातले काही जण मला म्हणायचे, ''तुम्ही हे सगळे लिहून का काढत नाही ? सगळ्यांनाच त्याचा आनंद घेता येईल''; पण तेव्हा मी ते फारसे मनावर घेतले नाही.

**३. गोव्याला आल्यावर डॉक्टरांशी बोलतांना प.पू. बाबांच्या आठवणी निघणे आणि त्यांनी 'हा इतिहास असल्याने लिहून काढा', असे सांगणे :** डॉक्टरांच्या (डॉ. आठवले यांच्या) आजारपणाच्या निमित्ताने दळणवळण बंदीच्या काळात मला गोव्याला यावे लागले. डॉक्टरांशी बोलतांना प.पू. बाबांच्या आणि प.पू. दादांच्या आठवणी निघायच्या. त्या वेळी मला जे आठवायचे, ते मी त्यांना सांगायचे. तेव्हा डॉक्टर मला म्हणायचे, ''हा तर इतिहास आहे. हे सगळे लिहून काढा. आपल्या अध्यात्माच्या मार्गावरील वाटचालीबद्दलही लिहा.''

**४. सगळे प्रसंग सलग आठवत नसल्याने साधनेच्या वाटचालीविषयी लिहिणे अवघड वाटणे, प.पू. बाबांना शरण जाऊन प्रार्थना केल्यावर ३० – ३५ वर्षांतला सगळा घटनाक्रम आठवू लागणे आणि प.पू. बाबांनीच 'गुरुगीता' लिहून घेतल्याचे जाणवणे :** मला हे थोडेसे अवघड काम वाटले; कारण वाटचालीबद्दल लिहायचे, तर सगळे प्रसंग सलग आठवले पाहिजेत. मला मधले मधले प्रसंगच आठवायचे. शेवटी मी प.पू. बाबांनाच शरण गेले आणि त्यांना विनंती केली, 'तुम्हीच मला सगळी आठवण करून द्या.' आश्चर्य म्हणजे मला मागच्या ३० – ३५ वर्षांतला सगळा घटनाक्रम आठवू लागला. शेवटी प.पू. बाबांनी माझ्याकडून 'गुरुगीता' लिहून घेतली. मी काही साहित्यिक नाही. 'बोलवितो मज नंदाचा नंदन' या भावाने माझ्याकडून हे लिखाण झाले आहे. तरी ते गोड मानून घ्या. 'चांगले आहे, ते माझ्या गुरूंचे आहे आणि चुका झाल्या असतील, तर त्या माझ्या आहेत', असे समजून वाचन करा. लिखाणात काही त्रुटी असू शकतील. त्याबद्दल क्षमस्व !

**५. प.पू. बाबांच्या आठवणीची ही भेट कृतज्ञताभावाने प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या चरणी अर्पण ! :** प.पू. बाबांच्या आणि प.पू. दादांच्या लीला अगाध अन् अमाप आहेत. त्यांतले माझ्या हाताला लागलेले अल्पसे कण मी वेचले आणि आपल्यापुढे सादर केले. माझ्यासाठी जे प्रेरणादायी ठरले, ते इतरांनाही मिळावे; म्हणून हा छोटासा प्रयत्न ! ही छोटीशी भेट कृतज्ञताभावाने प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांच्या चरणी अर्पण करते. 'प.पू. बाबा आणि प.पू. दादा यांचे प्रेम आणि कृपाशीर्वाद आम्हा दोघांना, त्यांचे सगळे शिष्य, भक्त आणि साधक यांना मिळो', हीच ईश्वरचरणी प्रार्थना !'

**– डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले, गोवा (३.१२.२०२०)**

**'गुर्वाज्ञापालनाने आज्ञाचक्राचा भेद होतो.' – प.पू. भक्तराज महाराज**